| प्रश्नपत्रिका क्र. | 213374 |
|---|---|

| कोड : | १०१ |
|---|---|

महाराष्ट्र राज्य शिक्षक पात्रता परीक्षा, २०१५
(MAHATET)

परीक्षा दिनांक : १६/०१/२०१६ **माध्यम : मराठी** पेपर I (इ. १ली ते इ. ५वी)

बैठक क्रमांक

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

वेळ : सकाळी १०.३० ते दुपारी १.००

| एकूण गुण | १५० |
|---|---|

| एकूण पृष्ठे | २४ |
|---|---|

## प्रश्नपत्रिका सोडविण्यापूर्वी कृपया खालील सूचना काळजीपूर्वक वाचा.

सूचना :

१) प्रश्नपत्रिकेमध्ये सलग एकूण १५० प्रश्न असून ते सोडविण्यासाठी उमेदवारास अडीच तास वेळ देण्यात आलेला आहे. प्रत्येक प्रश्नास एक गुण आहे. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

२) प्रत्येक प्रश्न वस्तुनिष्ठ स्वरूपाचा असून प्रश्नाच्या खाली उत्तराचे पर्याय दिलेले आहेत. उत्तर नोंदविताना चार पर्यायांपैकी बरोबर उत्तर असलेल्या पर्याय क्रमांकाच्या वर्तुळाला काळ्या/निळ्या शाईच्या बॉलपेनने पूर्णपणे रंगवून उत्तर देणे आवश्यक आहे. अर्धवट रंगवलेले वर्तुळ, खाडाखोड अथवा एकाच प्रश्नासाठी दोन उत्तरे दर्शविलेली असतील अशा उत्तरांना गुण दिले जाणार नाहीत. पेन्सिलीने नोंदविलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत. प्रश्नपत्रिकेमध्ये खालीलप्रमाणे विषयनिहाय प्रश्न आहेत.

| | | | माध्यम |
|---|---|---|---|
| • भाग - A : भाषा १ व २ | - प्रश्न-क्रमांक १ ते ६० | - ६० गुण | इंग्रजी, मराठी |
| • भाग - B : बालमानसशास्त्र व अध्यापनशास्त्र | - प्रश्न-क्रमांक ६१ ते ९० | - ३० गुण | मराठी |
| • भाग - C : गणित | - प्रश्न-क्रमांक ९१ ते १२० | - ३० गुण | मराठी |
| • भाग - D : परिसर अभ्यास | - प्रश्न-क्रमांक १२१ ते १५० | - ३० गुण | मराठी |

३) एकदा दिलेले उत्तर बदलता येणार नाही.

४) प्रश्नाला दिलेले पर्याय अचूक उत्तराच्या सदृश असतात. त्यामुळे सर्वात अचूक उत्तराच्या वर्तुळाला गिरविणे आवश्यक आहे, याची परीक्षार्थीने नोंद घ्यावी.

५) प्रत्यक्ष परीक्षा झाल्यानंतर एक आठवड्याचे आत संभाव्य उत्तरसूची जाहिर करण्यात येईल. प्रश्नपत्रिकेमधील प्रश्नांबाबत प्राप्त आक्षेपांनुसार कोणत्याही कारणामुळे प्रश्न (प्रश्न व पर्यायी उत्तरे) चुकीचे आहेत असे आढळल्यास व परिषदेच्या तज्ञ समितीने ते मान्य केल्यास ते प्रश्न रद्द करून उर्वरित प्रश्नांच्या गुणांवर आधारित तज्ञ समितीने निश्चित केलेल्या निश्चित सूत्रानुसार अचूक प्रश्नांच्या गुणांनुसार पात्रता जाहिर करण्यात येईल.

६) परीक्षार्थीने आपला बैठक क्रमांक त्यांना पुरविलेल्या प्रश्नपत्रिकेवर नोंदवावा.

७) प्रश्नपत्रिकेत कोणत्याही प्रश्नांच्या उत्तराची नोंद करू नये. उत्तरपत्रिकेचा,

करू नये.

८) कच्चे काम करण्यासाठी प्रश्नपत्रिकेच्या शेवटच्या पानावर दिलेल्या कोऱ्या

९) परीक्षार्थीने प्रश्नपत्रिकेचा व उत्तरपत्रिकेचा क्रमांक स्वाक्षरी पटावर लिहि

१०) परीक्षा प्रवेशपत्राची मागणी केल्यास पर्यवेक्षकास दाखवावे.

११) उत्तरपत्रिका देताना उत्तरपत्रिकेची Carbonless प्रत परीक्षार्थीने परीक्षा झाल्यानंतर परत घेऊन स्वाक्षरी पटावर दुसरी स्वाक्षरी करावी. दुसरी स्वाक्षरी नसल्यास त्याने उत्तरपत्रिका पर्यवेक्षकाकडे दिलेली नाही असे समजण्यात येईल.

१२) पर्यवेक्षकाच्या सूचनेशिवाय परीक्षागृह सोडू नये.

१३) परीक्षार्थीने परीक्षा चालू असताना अथवा परीक्षा संपल्यानंतर परीक्षेसंबंधी कोणतेही साहित्य परीक्षागृहाबाहेर नेल्यास / नेल्याचे निदर्शनास आल्यास त्याची या परीक्षेतील उमेदवारी रद्द होईल. त्याचबरोबर त्यांचेविरुद्ध भारतीय दंडसंहिता (IPC) अंतर्गत कारवाई करण्यात येईल.

Scanned by CamScanner

## भाग - A : इंग्रजी

1. Choose the 'mis-spelt' word from the given words :
   (1) progression (2) profession (3) privelige (4) prerequisite

2. Select the correct name of the underlined clause :
   *That the train will be late is certain.*
   (1) Noun Clause (2) Adverb Clause (3) Adjective Clause (4) Relative Clause

3. Choose the correct 'active voice' sentence of the given sentence :
   *Leopards are surrounded by human settlements.*
   (1) Human settlements surrounded leopards.
   (2) Human settlements surrounds leopards.
   (3) Human settlement have surrounded leopards.
   (4) Human settlements surround leopards.

4. Choose the correct 'past perfect tense' sentence from the given sentences :
   (1) Around 7pm., the power had gone off.
   (2) Around 7pm., the power has gone off.
   (3) Around 7pm., the power has went off.
   (4) Around 7pm., the power was gone off.

5. Select the correct 'indirect speech' sentence of the given sentence :
   *Mr. Khan said, "How beautiful it is to get our cars cleaned !"*
   (1) Mr. Khan exclaimed it was very beautiful to get their cars cleaned.
   (2) Mr. Khan exclaimed that it was very beautiful to get their cars cleaned.
   (3) Mr. Khan exclaimed that it was very beautiful to got their cars clean.
   (4) Mr. Khan exclaimed that it wasn't very beautiful to get their cars cleaned.

6. The correct 'Synonym' of 'Predict' is :
   (1) observe (2) assert (3) foretell (4) explain

7. Choose the correct opposite of 'endow' :
   (1) divert (2) dispossess (3) rob (4) snatch

8. Choose the correct part of the sentence that has an error :
   *Neither did he / accept the punishment / or apologised / for his mistake.*
   *a* *b* *c* *d*
   (1) a (2) b (3) c (4) d

9. Select the correct 'degree sentence' of the given sentence :
   *Dogs are easier to catch than deer or boar.*
   (1) Deer or boar are not as easy to catch as dogs.
   (2) Dogs are the easiest to catch.
   (3) Deer or boar are as easy to catch as dogs.
   (4) Dogs aren't as easy to catch as deer or boar.



Scanned by CamScanner

10. Choose the correct preposition in the given sentence :

*Kiran was innocent ______ the guilt.*

(1) of (2) after (3) with (4) on

11. The phrase 'A dark horse' means :

(1) An unknown person (2) A nightmare
(3) A black horse (4) An unforeseen competitor

12. Choose the grammatically wrong sentence :

(1) Neither he nor I was there. (2) Many a glorious deeds were done.
(3) Our followers are but a handful. (4) Everyone of the boys loves the ride.

13. 'The study of birds' is called :

(1) petrology (2) ornithology (3) orthoepy (4) pedagogy

14. Choose the correct 'question tag' for the given sentence :

*There has been a lot of improvement.*

(1) has there ? (2) hasn't been there ?
(3) hasn't it ? (4) hasn't there ?

15. The phobia about 'travel' is called :

(1) hodophobia (2) nyctophobia (3) biblophobia (4) peniphobia

16. The diminutive of 'statue' is :

(1) structural (2) statuete (3) statuette (4) statuetate

17. The sound of 'hoofs' is called :

(1) clang (2) croak (3) clatter (4) hoot

18. 'A place for ammunition and weapons' is called :

(1) Arena (2) Arsenal (3) Asylum (4) Pantry

19. 'The young one of eagle' is called :

(1) Eaglet (2) Eagling (3) Cygnet (4) Eagle

20. Choose the correct answer of the given sentence :

*Give advice on this problem.*

(1) Let advice be given on that problem.
(2) Let advice be gave on this problem.
(3) Let be advice given on this problem.
(4) Let advice be given on this problem.



Scanned by CamScanner

21. Choose the correct 'Hardly .............. when' sentence of the given sentence :

*As soon as Keku came home, all were happy.*

(1) Hardly had Keku come home when all were happy.

(2) Hardly had Keku came home when all were happy.

(3) Hardly had Keku came home when all are happy.

(4) Hardly Keku came home when all were happy.

22. Choose the appropriate alternative to fill in the blank :

*If K. Nath had gone away, we _______ him.*

(1) missed (2) would have missed

(3) would miss (4) will miss

23. Choose the correct 'not only ................. but also' of the given sentence.

*The boys let out a hurrah and started jumping about.*

(1) Not only the boys let out a hurrah but also started jumping about.

(2) The boys let out not only hurrah but also started jumping about.

(3) The boys not only let out a hurrah but also started jumping about.

(4) The boys let out hurrah not only started but jumping about also.

24. Choose the correct 'Wh-Question' to get underlined part as answer :

*The ten-member team set up <u>a cage</u> with a live bait.*

(1) What did the ten-member team set up with a live bait ?

(2) What do the ten-member team set up with a live bait ?

(3) What did the ten-member team sat up with a live bait ?

(4) What the ten-member team did set up with a live bait ?

25. Choose the correct 'active voice' sentence from the given sentences :

(1) Some children were given money.

(2) I'll miss out on a few people.

(3) Cricket had been played for India.

(4) Keku was sent to Latur for higher education.



Scanned by CamScanner

*Read the following passage carefully and select the most correct answers of the given questions.* ***[Q. Nos. 26 to 30]***

The capitalist system of society does not foster healthy relations among human beings. A few people own all the means of production and others - though nominally few have to sell their labour under conditions imposed upon them. The emphasis of capitalism being on the supreme importance of material wealth the intensity of its appeal is to the acquisitive intensity. It promotes worship of economic power with little regard to the means employed for its acquisition and the end that it serves. By its exploitation of human beings to the limits of endurance its concentration is on the largest profit rather than maximum production. Thus the division of human family is done on the basis of economic circumstance. All this is injurious to division of human dignity. And when the harrowed poor turn to the founders of religion for succour, they rather offer a subtle defence of the established order. They promise future happiness for their present suffering and conjure up visions of paradise to redress the balance to soothe the suffering and the revolt of the tortured men. The system imposes injustice, the religion justifies it.

**26.** The passage indicates that the capitalist system is :

(1) prosperous (2) fair (3) ambitious (4) dehumanising

**27.** The established order is supported by religion to :

(1) Perpetuate the injustice imposed by the capitalist system.

(2) Alleviate the suffering of the poor in the capitalist system.

(3) Balance the suffering of the poor with hopes of future rewards.

(4) Help the tutored men to seek redress.

**28.** In a capitalist system :

(1) the means justify the ends.

(2) the means endorsed by religion are strictly followed.

(3) means which lead to exploitation are strictly prohibited.

(4) the ends justify the means.

**29.** Capitalism is injurious to human relations because it divides society into two groups, i.e. :

(1) exploiters and exploited. (2) working and non-working.

(3) religious and irreligious. (4) buyers and sellers.

**30.** In a capitalistic system of society each man wishes :

(1) to produce maximum wealth. (2) to have visions of paradise.

(3) to acquire maximum wealth. (4) to soothe the sufferings of others.



Scanned by CamScanner

## भाग - A : मराठी

*खालील उतारा वाचून त्याखालील प्रश्न-क्रमांक* **31** *ते* **34**-*ची उत्तरे दिलेल्या पर्यायातून निवडा :*

महत्त्वाकांक्षा हा तर तरुणांचा स्थायिभाव ! मी मोठा होईन, परिस्थितीच्या डोक्यावर पाय ठेवून मी तिला वाकविन. ही तरुणाची उभारीची उर्मी असते. निर्भयता म्हणजे तरुणाच्या जीवनसंगीतातल्या सगळ्यात उंच स्वर. 'भय' हा या स्वराचा फुटलेला चिरका आवाज ! चिरका आवाज कोणाला कधीतरी आवडेल का ? जग उंच स्वराची तान एकायला उत्सुक असतं, चिरका आवाज़ नाही.

अभिमान असतो तारुण्याचा आत्मा ! ज्या माणसात श्रद्धा नाही तो माणूस नाही आणि ज्या तरुणात अभिमान नाही तो तरुण नाही. माणूस हा आपल्या श्रद्धांचा नेहमीच अभिमान बाळगतो. त्यांच्यासाठी प्रसंगी प्राण द्यायला तयार असावं लागतं आणि औदार्य म्हणजे तर तरुणाचा अलंकार ! आपल्या शक्तीचा इतर दुर्बलांच्या संरक्षणासाठी केलेला वापर आपण जगून इतरांना जगविण्याचं अमोल साधन !

**31.** तरुणांकडे कोणत्या गुणांचा ठेवा असावा ?

(1) महत्त्वाकांक्षा (2) निर्भयता
(3) श्रद्धा (4) महत्त्वाकांक्षा, निर्भयता, श्रद्धा

**32.** या उताऱ्यातील तरुणांना कोणती उर्मी असते ?

(1) दुर्बलांच्या संरक्षणाची (2) निरर्थक अभिमानाची
(3) परिस्थितीला वाकविण्याची (4) निसर्गावर मात करण्याची

**33.** जग काय एकायला उत्सुक असतं ?

(1) उंच स्वराची तान (2) चिरका आवाज
(3) उर्मी (4) अभिमान

**34.** तरुणांचा अलंकार कोणता सांगितला आहे ?

(1) अभिमान (2) स्थायिभाव (3) औदार्य (4) आत्मा

**35.** 'गैरहजेरी' शब्दाचा समानार्थी शब्द कोणता ?

(1) बेरोजगार (2) अनुदिनी (3) अनुपस्थिती (4) बेपर्वा

**36.** "एक हजार रुपये ही देखील मोठी रक्कम आहे" या वाक्याचे अर्थ न बदलता नकारार्थी वाक्य कोणते ?

(1) एक हज़ार रुपये फार मोठी रक्कम नाही.
(2) एक हजार रुपये ही काही लहान रक्कम नाही.
(3) एक हजार रुपयांना आज कवडीची किंमत नाही.
(4) एक हजार रुपयात आज किराणा देखील होत नाही.

**37.** 'रोपटे' या शब्दाचे अनेकवचन कोणते ?

(1) रोपटे (2) रोपे (3) रोपटी (4) रोपटं



Scanned by CamScanner

38. पुढीलपैकी कोणत्या वाक्यात सकर्मक क्रियापद आहे ?

(1) आज भाऊबीज आहे. (2) अजिंक्य उदया नागपूरला जाईल.

(3) काल खूप पाऊस पडला. (4) अबोली निबंध लिहिते.

39. 'अति शहाणां त्याचा बैल रिकामा' या म्हणीचा योग्य अर्थ कोणता ?

(1) खूप हुशारीने फायदा होतो.

(2) आपल्या ऐपतीनुसार खर्च करावा.

(3) वाजवीपेक्षा जास्त शहाणपण नुकसानकारक ठरते.

(4) अति हुशार माणसाची कोणतीही गोष्ट विकल्या जाते.

40. '<u>मी स्वत:</u> त्याला पाहिले.' या वाक्यातील अधोरेखित सर्वनामाचा प्रकार कोणता ?

(1) प्रश्नार्थक (2) संबंधी (3) आत्मवाचक (4) दर्शक

41. पुढीलपैकी गुणविशेषणाचे उदाहरण कोणते ?

(1) गोड केळी (2) वीस आंबे (3) तिप्पट अंतर (4) चार चाकी

42. 'खग'चा समानार्थी शब्द कोणता ?

(1) भूगोल (2) खगोल (3) पक्षी (4) अंतराळ

43. 'पृथ्वी सूर्याभोवती फिरते' या वाक्याचा काळ कोणता ?

(1) साधा वर्तमानकाळ (2) अपूर्ण वर्तमानकाळ

(3) पूर्ण वर्तमानकाळ (4) भविष्यकाळ

44. "हो ! जेवल्यानंतर मी सर्व गोष्ठी वाचून टाकणार आहे." या वाक्यात किती विरामचिन्हे आली आहेत ?

(1) 4 (2) 3 (3) 2 (4) 5

45. पुढीलपैकी योग्य सामान्यरूप ओळखा :

(1) फडक्यांना (2) फडकेला (3) फडकीला (4) फडकेली

*पुढील कविता वाचून प्रश्न-क्रमांक 46 ते 49ची उत्तरे दिलेल्या पर्यायातून निवडा :*

उठूनी प्रभावीत ती मधमाशी
जाते की मध मिळवायासी ॥
थेंबे थेंबे साठवि त्यासी
उद्योगी मोठी ॥१॥

आळस तिजला ठाऊक नाही
सर्व दिवस ती खपते पाही ॥
थंडी ऊन म्हणेना काही
उद्योगी मोठी ॥२॥



Scanned by CamScanner

गोड गोड मध निपटुनी घेते ।
थोडा म्हणूनी मुळी न रुसते ।।
साठवुनी ती जपुनि ठेवते
उद्योगी मोठी ।।३।।

थोडाही गुण मिळता घ्यावा
साठा त्याचा नित्य करावा ।।
कोणालाही तो शिकवावा
ठेवा हे चित्ती ।।४।।

46. मधमाशी आपणास कोणत्या गोष्टींचा साठा करण्याची शिकवण देते ?
(1) गुणांचा (2) कामाचा (3) धनाचा (4) मधाचा

47. मधमाशी दिवसभर काय करते ?
(1) मध पिते (2) कष्ट करते (3) विश्रांती घेते (4) मध विकते

48. मधमाशीच्या अंगी कोणता गुण आहे ?
(1) खादाडपणा (2) सुस्तपणा (3) उद्योगीपणा (4) आळशीपणा

49. 'संचय करणे' यासाठी कोणता समानार्थी शब्द कवितेत आला आहे ?
(1) संचित करणे (2) जमवणे (3) निपटून घेणे (4) साठवणे

50. पुढीलपैकी शुद्ध शब्द कोणता ?
(1) वाङ्मय (2) वांगमय (3) वाक्मय (4) वांडमय

51. पुढीलपैकी अर्थाच्या दृष्टीने गटात न बसणारा शब्द ओळखा :
(1) नेता (2) नायक (3) म्होरक्या (4) गुंडा

52. भूकंपग्रस्त भागात नेमका सापडल्याने सुटकेसाठी कोणती गोष्ट करावी हे न सुचल्याने मी दुर्दैवाच्या कचाटात सापडलो.
अधोरेखित शब्दसमूहासाठी योग्य तो वाक्प्रचार कोणता ?
(1) पोपट होणे (2) मती कुंठित होणे
(3) इकडे आड तिकडे विहिर होणे (4) तंद्रीत असणे

53. फेब्रुवारी 2009 मध्ये सॅनहोजे (अमेरिका) येथे झालेल्या विश्व मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष कोण होते ?
(1) आ. ह. साळुंखे (2) प्रा. राम शेवाळकर
(3) ना. धो. महानोर (4) डॉ. गंगाधर पानतावणे

54. 'गोंदण, जन्मजान्हवी' या कवितासंग्रहाचे कवी कोण ?
(1) ग. दि. माडगूळकर (2) मंगेश पाडगावकर
(3) शांता शेळके (4) पद्मा गोळे

55. 'आज्ञापत्रकार' रामचंद्रपंत अमात्य यांचे पूर्ण नाव काय ?
(1) रामचंद्र मोरोपंत पराडकर (2) रामचंद्र नीळकंठ बावडेकर
(3) रामचंद्र नारायण पेशवे (4) रामचंद्र शहाजी भोसले



Scanned by CamScanner

56. 'मी वनवासी' हे आत्मचरित्र कोणाचे आहे ?

(1) साधना आमटे (2) सिंधुताई सपकाळ

(3) शांता शेळ्के (4) राणी बंग

57. कथाकार, कादंबरीकार, नाटककार व शाहीर असलेले साहित्यिक कोणते ?

(1) होनाजी बाळा (2) पठ्ठे बापूराव (3) अण्णाभाऊ साठे (4) विठ्ठल उमप

58. "कान फुटले तुहे का तोंडाले कुलूप लावल कोन ?" हे वाक्य कोणत्या बोलीभाषेतील आहे ?

(1) अहिराणी (2) वऱ्हाडी (3) वारली (4) झाडीबोली

59. पुढीलपैकी कोणता वर्ण कठोर वर्ण आहे ?

(1) फ् (2) ब् (3) ढ् (4) न्

60. 'आ' हा स्वर कोणत्या वर्णप्रकारात मोडतो ?

(1) ओष्ठ्य (2) कंठ्य (3) दंत्य (4) मूर्धन्य

## भाग - B : बालमानसशास्त्र व अध्यापनशास्त्र

61. 'उपपत्ती म्हणजे आपल्याला जे ज्ञात आहे, त्या आधारे कोणत्या तरी प्रकारे दृष्टीक्षेप टाकण्याची, अंदाज करण्याची आणि रचना करण्याची वृत्ती' ही व्याख्या खालीलपैकी कोणत्या मानसशास्त्रज्ञाने दिली आहे ?

(1) थॉर्नडाइक (2) कॅम्पबेल (3) स्किनर (4) स्टाईल

62. व्यक्तिगत भेदांच्या विविध क्षेत्रांचा योग्य गट कोणता आहे ?

(1) प्राविण्य, बुद्धिमत्ता, सर्जनशीलता

(2) प्राविण्य, बुद्धिमत्ता, भावात्मक क्षेत्र

(3) सर्जनशीलता, भावात्मक क्षेत्र, भावनिक बुद्धिमत्ता

(4) वरील सर्व

63. खाली दिलेल्या अध्ययन अकार्यक्षम मुलांच्या लक्षणांमध्ये कोणते लक्षण योग्य आहे ?

(1) ही मुले योग्य व आवश्यक गोष्टीमध्ये रमतात.

(2) या विद्यार्थ्यांची अवधानकक्षा सामान्य असते.

(3) ही मुले नेमून दिलेले काम पूर्ण करण्याकडे लक्ष देत नाहीत.

(4) ही मुले स्थीर असतात.

64. खाली दिलेल्या विधानांमध्ये मतिमंद मुलांचे कोणते लक्षण नाही ?

(1) एकाग्रतेचा अभाव असणे.

(2) समायोजनक्षम असणे.

(3) कोणत्याही गोष्टीची पुनरावृत्ती करावी लागणे.

(4) संप्रेषण कौशल्याचा अभाव असणे.



Scanned by CamScanner

65. 'जन्मजात स्वभाव हा व्यक्तिमत्व विकासातील महत्त्वाचा घटक आहे.' असे अनुवंशाविषयी मत खालीलपैकी कोणत्या मानसशास्त्रज्ञाने मांडले ?

(1) टी.पी. नन (2) ग्रेगार मेंडेल (3) गाल्टन (4) लेविन

66. थर्स्टन यांच्या बुद्धिमत्तेच्या अनेक घटक सिद्धांतावर घेतलेल्या आक्षेपांपैकी खालीलपैकी कोणते आक्षेप बरोबर आहेत ?

(अ) थर्स्टनने सांगितलेल्या प्राथमिक, मानसिक क्षमता पूर्णपणे स्वतंत्र नाहीत.

(ब) कसोट्यांमध्ये सहसंबंध असल्याचे आढळून आले.

(क) मानसिक क्षमता परस्परांपासून वेगळ्या नाहित.

(1) (अ) आणि (ब) फक्त (2) (ब) आणि (क) फक्त

(3) (अ) आणि (क) फक्त (4) (अ), (ब), (क), सर्व

67. अध्यापन परिणामकारक होण्यासाठी खालीलपैकी कोणती तत्त्वे सहाय्यभूत ठरतात ?

(अ) अध्यापन प्रभावी होण्यासाठी उद्दिष्टे अगोदर निश्चित केली जातात.

(ब) अध्ययनार्थ्याच्या उपजत क्षमता विकसित करणे अनावश्यक असते.

(क) अध्ययनार्थ्याच्या पूर्वज्ञानाची दखल घेऊन नवीन ज्ञानाशी संबंध प्रस्थापित करावा.

(ड) अध्ययनार्थ्यात दैनंदिन अनुभव अत्यंत महत्त्वाचा असतो.

(1) (अ), (ब) आणि (ड) फक्त (2) (अ), (क) आणि (ड) फक्त

(3) (अ), (ब) आणि (क) फक्त (4) (अ), (ब), (क), (ड), सर्व

68. खालीलपैकी कोणते विधान अध्ययन प्रक्रियेचे ठळक वैशिष्ट्य नाही ?

(1) अध्ययन हे सहेतूक असते.

(2) अध्ययनामुळे नवीन गोष्टींची धारणा होते.

(3) सर्व प्राण्यांचे अध्ययन सारखे असते.

(4) दीर्घकाळ सराव केला नाही तर अध्ययनाचे स्मरण रहात नाही.

69. खालीलपैकी अवधानाचे नियंत्रण करणारे बाह्य घटक कोणते ?

(अ) अभिरूची (ब) तात्कालिक गरज

(क) पुनरावृत्ती (ड) वैचित्र्य

(1) (अ) आणि (ब) फक्त (2) (अ) आणि (क) फक्त

(3) (ब) आणि (क) फक्त (4) (क) आणि (ड) फक्त

70. ज्ञानेंद्रियांमार्फत ग्रहण केलेला अनुभव जपून ठेवणे म्हणजे धारणा या बाबत खालीलपैकी कोणते विधान अयोग्य आहे ?

(1) धारणेचा पुरावा आपणांस व्यक्तिच्या वर्तनावरुन किंवा शाब्दिक अभिव्यक्तीवरुन मिळतो.

(2) व्यक्तिपरत्वे धारणा भिन्न असते.

(3) एका व्यक्तीची धारणाशक्ती सर्व गोष्टींच्या बाबतीत सारखी असते.

(4) धारणा चांगली होण्यासाठी पठनानंतर विश्रांतीची गरज असते.



Scanned by CamScanner

71. समष्टीवादी संप्रदायाने अवबोध या मानसिक प्रक्रियेचा विशेष अभ्यास करून मांडलेल्या मतांपैकी कोणते मत असत्य आहे ?

(1) संवेदने मार्फत आपल्याला जे आकलन होते ते अंशतः होते.

(2) समस्येचे एकदा निरीक्षण केले की मर्म समजते.

(3) त्यातून समस्या सोडविण्याची युक्ती सापडते.

(4) शेवटी समस्येच्या मर्मावरच आपली दृष्टी केंद्रित होते.

72. आपण पाहिलेला एखादा क्रिकेटचा सामना मनःपटलावर जसाचा तसा साकार होतो तेव्हा मानसशास्त्राच्या भाषेत याला पुढीलपैकी कोणती कल्पना म्हणतात ?

(1) व्यवहारिक कल्पना
(2) स्वैर कल्पना
(3) पुनरुत्पादित कल्पना
(4) सौंदर्यनिष्ठ कल्पना

73. आकृत्यांसंबंधी चित्रमय कोडी सोडवता येणे, पाहिलेल्या रचना, आकार यांचे मनात चित्र तयार करता येणे, एखादी वस्तू समोर नसतांनाही तिच्या झालेल्या अवबोधावर क्रियाप्रक्रिया करता येणे, तिच्यात बदल करून नवीन काय होईल ते डोळ्यासमोर आणता येणे, ही सर्व खालीलपैकी कोणत्या बुद्धिमत्तेची लक्षणे आहेत ?

(1) तर्कनिष्ठ गणितीय बुद्धिमत्ता

(2) वैयक्तिक बुद्धिमत्ता

(3) शारीरिक गतिशील बुद्धिमत्ता

(4) अवकाशविषयक बुद्धिमत्ता

74. अध्यापन करताना विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान जागृत करून नवीन ज्ञानाविषयी जिज्ञासा निर्माण केल्यास त्यांचे अध्ययन सुकर होईल असे थॉर्नडाईकने मांडलेल्या अध्ययनाच्या पुढीलपैकी कोणत्या नियमानुसार साध्य होते ?

(1) सज्जतेचा नियम
(2) पुनरावृत्तीचा नियम
(3) परिणामाचा नियम
(4) परागतीचा नियम

75. अध्ययन उपपत्तींच्या 'साहचर्यवादी उपपत्ती' या वर्गात खालीलपैकी कोणत्या उपपत्तींचा समावेश होतो ?

(अ) थॉर्नडाईकची सहसंबंध उपपत्ती

(ब) पॅव्हलॉवची अभिजात अभिसंधान उपपत्ती

(क) ब्रुनरची ज्ञानात्मक उपपत्ती

(ड) स्किनरची साधक अभिसंधान उपपत्ती

(1) (अ), (ब), आणि (क) फक्त
(2) (ब), (क) आणि (ड) फक्त
(3) (अ), (ब) आणि (ड) फक्त
(4) (अ), (ब), (क), (ड) सर्व



Scanned by CamScanner

76. खाली दिलेल्या प्रेरणा व त्यातील घटक यांच्या योग्य जोड्यांचा क्रम कोणता ?

| प्रेरणा | | घटक |
|---|---|---|
| (अ) शारीरिक प्रेरणा | – | (i) स्थैर्य |
| (ब) व्यक्तिगत प्रेरणा | – | (ii) अभिरुची |
| (क) सहवासविषयक प्रेरणा | – | (iii) भूक |
| (ड) प्रतिष्ठा विषयक प्रेरणा | – | (iv) समाजमान्यता |

(1) (अ) – (iii), (ब) – (ii), (क) – (iv), (ड) – (i)
(2) (अ) – (i), (ब) – (iii), (क) – (ii), (ड) – (iv)
(3) (अ) – (iii), (ब) – (i), (क) – (iv), (ड) – (ii)
(4) (अ) – (iv), (ब) – (iii), (क) – (ii), (ड) – (i)

77. खालीलपैकी कोणकोणत्या घटकांचे अध्ययनातून संक्रमण होते ?

(अ) विशिष्ट दृष्टिकोन व बंधुभाव
(ब) निष्ठा व मूल्य
(क) पद्धती व कौशल्य
(ड) ज्ञान व तंत्र

(1) (अ), (ब), आणि (क) फक्त
(2) (ब), (क), आणि (ड) फक्त
(3) (अ), (क), आणि (ड) फक्त
(4) (अ), (ब), (क), (ड) सर्व

78. उजव्या हाताला दिलेल्या सरावामुळे प्राप्त झालेले कौशल्य डाव्या हाताला किती प्रमाणात प्राप्त होते हे पाहण्यासाठी आरसा व चांदणी या उपकरणांचा उपयोग करून कोणी प्रयोग केला ?

(1) सी. एच. जड्ड
(2) डॉ. गोपाल स्वामी
(3) थॉर्नडाईक
(4) बॅग्ले

79. ज्ञान प्रक्रियाकरण प्रतिमाने व त्यांचे प्रणेता यांच्या योग्य जोड्यांचा क्रम कोणता ?

| ज्ञान प्रक्रियाकरण प्रतिमान | | प्रणेता |
|---|---|---|
| (अ) उद्गमन विचार | – | (i) जोसेफ श्वाब |
| (ब) पृच्छा प्रशिक्षण | – | (ii) जेरोम ब्रुनर |
| (क) जीवशास्त्रीय पृच्छा | – | (iii) हिल्डा टाबा |
| (ड) संबोध साध्यता | – | (iv) रिचर्ड सचमन |

(1) (अ) – (ii), (ब) – (iii), (क) – (i), (ड) – (iv)
(2) (अ) – (iii), (ब) – (iv), (क) – (i), (ड) – (ii)
(3) (अ) – (i), (ब) – (iii), (क) – (ii), (ड) – (iv)
(4) (अ) – (iv), (ब) – (iii), (क) – (ii), (ड) – (i)



Scanned by CamScanner

80. खालीलपैकी कोणती निरीक्षण पद्धतीची वैशिष्ट्ये आहेत ?

(अ) निरीक्षण नैसर्गिक व कृत्रिम परिस्थितीत करता येते.

(ब) निरीक्षणाच्या नोंदी अनेक प्रकारे करता येतात.

(क) निरीक्षणासाठी सुधारित साधनांचा वापर करणे शक्य असते.

(ड) या पद्धतीने मानव व प्राणी यांचा सामाजिक अभ्यास करता येतो.

(1) (अ), (ब) आणि (क) फक्त (2) (अ), (क) आणि (ड) फक्त

(3) (ब), (क) आणि (ड) फक्त (4) (अ), (ब), (क), (ड) सर्व

81. अध्यापनाविषयी वेगळा विचार करणाऱ्या विचारवंताची खाली काही विधाने मांडली आहेत. त्यापैकी अयोग्य विधान कोणते ?

(1) शिक्षक आणि अध्ययनार्थी यांच्यातील आंतरक्रिया महत्त्वाची होय.

(2) वर्गाध्यापन चालु असताना शिक्षकांचा परिणाम अध्ययनार्थ्यावर होतो.

(3) अध्ययनार्थीचा परिणाम शिक्षकावर होत नाही.

(4) वर्गाध्यापनामध्ये वातावरण निर्मिती महत्त्वाची असते.

82. खाली किशोरावस्थेतील मुलांच्या मानसिक व भावनिक कौशल्याविषयी दिलेल्या विधानांमध्ये कोणती विधाने सत्य आहेत ?

(अ) या अवस्थेतील मुलांचे नवीन मित्र मिळवण्याकडे विशेष लक्ष असते.

(ब) सभोवतालच्या मूर्त वस्तुंबद्दल संकल्पना जागृत झालेल्या असतात.

(क) या मुलांची अवधान कक्षा अविस्तारीत असते.

(ड) नीती - अनीतीच्या कल्पना ठाम झालेल्या असतात.

(1) (अ) आणि (ब) फक्त (2) (ब) आणि (क) फक्त

(3) (क) आणि (ड) फक्त (4) (अ) आणि (ड) फक्त

83. खाली दिलेल्या विकासाबद्दलच्या विधानांमध्ये कोणते विधान योग्य आहे ?

(1) विकास भौतिक परिमाणात मोजला जातो.

(2) विकासाचा वेग सर्व व्यक्तिच्या बाबत सारखा असतो.

(3) विकास सुसंगत असेलच असे नाही.

(4) व्यक्ती आणि वातावरण यात आंतरक्रिया होऊन विकास घडून येतो.

84. नेतृत्वाचे प्रशिक्षण देण्यासाठी खालीलपैकी कोणकोणत्या उपक्रमांचे आयोजन शाळेने करावे ?

(अ) शिबिरे भरवून व्याख्यानांचे आयोजन करावे व चर्चा ठेवावी.

(ब) नेतृत्व प्रशिक्षण शिबिरात सामाजिकता शिकवावी.

(क) समाजसेवा, एन.सी.सी., एन.एस.एस., बालवीर पथक, वीरबाला पथक यांचा समावेश करावा.

(ड) अध्ययनार्थ्यांना कार्यक्रमांचे संचलन करण्याची संधी द्यावी आणि त्यांच्या ताब्यात विद्यार्थी भांडार द्यावे.

(1) (अ), (ब) आणि (क) फक्त (2) (अ), (क) आणि (ड) फक्त

(3) (ब), (क) आणि (ड) फक्त (4) (अ), (ब), (क), (ड), सर्व



Scanned by CamScanner

85. एखादी व्यक्ती महत्त्वाकांक्षी होण्यामागे स्त्रवणारा 'थायरॉक्सिन' हा स्त्राव खालीलपैकी कोणत्या ग्रंथी मधून स्त्रवतो ?

(1) मस्तक ग्रंथी (2) वृकस्थ ग्रंथी (3) कंठ ग्रंथी (4) जनन ग्रंथी

86. खालील उदाहरणांमध्ये कोणत्या विधानात अविष्कार प्रक्षेपण तंत्र वापरलेले आहे ?

(1) वर्गशिक्षकांनी सर्व विद्यार्थ्यांना समस्यासूची भरावयास दिली.

(2) विद्यार्थ्यांनी बाहुलीनाट्य सादर केले.

(3) विद्यार्थ्यांसाठी 'ओळखा पादू' हा खेळ घेतला.

(4) शिक्षकांनी विद्यार्थ्यांना आई - वडिलांची मुलाखत घ्यायला सांगीतली.

87. स्वतःच्या चुका शोधणे, आपल्या मनात डोकावून पाहणे, आपल्या भावना व अभिरुची शोधणे, आपल्या कमतरता व बलस्थाने शोधणे, स्वतःची योग्यता जाणणे, ही सर्व लक्षणे खालीलपैकी कोणत्या भावनिक क्षमतेची आहेत ?

(अ) आत्मनियंत्रण (ब) आत्मपरिचय (क) अभिप्रेरणा (ड) तद्नुभूती

88. विद्यार्थ्याचे कुसमायोजन झाल्यास खालीलपैकी कोणत्या वर्तनाच्या बाबी आढळून येतात ?

(अ) परिस्थितीला शरण जाणे.

(ब) मानसिक ताण कमी होणे.

(क) खोटे समाधान मानणे.

(ड) दिवास्वप्न पाहणे.

(1) (अ), (ब) आणि (क) फक्त (2) (ब), (क) आणि (ड) फक्त

(3) (अ), (क) आणि (ड) फक्त (4) (अ), (ब), (क), (ड) सर्व

89. अनिताच्या वर्गातील विद्यार्थिनींनी मिळविलेल्या गुणांचे मध्यमान 54.5 आणि मध्यांक 55.4 आहेत, तर वर्गातील विद्यार्थिनींनी मिळविलेल्या गुणांचे बहुलक किती ?

(1) 57.7 (2) 52.7 (3) 57.2 (4) 52.2

90. जेव्हा शिक्षक शिकवतांना खालील बाबी करतात तेव्हा ते कोणत्या अध्यापन पद्धतीचा वापर करतात ?

(अ) पूर्वनियोजन व पूर्वतयारी करतात.

(ब) सर्वांना दिसेल अशी व्यवस्था करतात.

(क) निरीक्षणाबद्दल निश्चित स्वरुपाच्या सूचना देतात.

(ड) साहित्याची मांडणी शास्त्रशुद्ध पद्धतीने करतात.

(1) कथन पद्धती (2) चर्चा पद्धती

(3) प्रयोग दिग्दर्शन पद्धती (4) उद्गामी-अवगामी पद्धती




Scanned by CamScanner

# भाग - C : गणित

91. 6, 36, 66 आणि 136 या कोणत्या प्रकारच्या संख्या आहेत ?
(1) चौरस संख्या (2) आयत संख्या (3) पंचकोनी संख्या (4) त्रिकोणी संख्या

92. एकूण रक्कमेपैकी 'A' कडे 0.6 पट आणि 'B' कडे $^2/_5$ पट रक्कम आहे. जर 'B' पेक्षा 'A' कडे 560 रुपये जास्त आहेत, तर 'A' कडील रक्कम किती रुपये असेल ?
(1) 2800 (2) 1680 (3) 1120 (4) 2250

93. प्रत्येक पृष्ठावर एक याप्रमाणे 'A' ते 'F' अशी सहा अक्षरे असलेल्या घनाकृतीची मांडणी खाली दर्शविलेली आहे. यावरुन 'C'च्या विरुद्ध पृष्ठावरं कोणते अक्षर असेल ?




(1) B (2) D (3) A (4) E

94. खालील पर्यायात दर्शविलेल्या संख्येइतक्या वस्तू काही मुलांना समान वाटायच्या असतील, तर कोणत्या वस्तूंचे समान वाटव होणार नाही ?
(1) 3179 (2) 3469 (3) 3509 (4) 3729

95. योग्य नित्य समानता दर्शविणारा पर्याय कोणता ?
(1) $\frac{1}{x^2} + 2x + x^2 = \left(x + \frac{1}{x}\right)^2$ (2) $\frac{1}{x^2} - x^2 = \left(x - \frac{1}{x}\right)\left(x + \frac{1}{x}\right)$
(3) $\left(\frac{1}{x} + x\right)^2 = \left(\frac{1}{x} - x\right)^2 - 4$ (4) $\frac{1}{9x^2} - 2 + (3x)^2 = \left(\frac{1}{3x} - 3x\right)^2$

96. एका वर्तुळाकृती बागेला चारपदरी कुंपण घालण्यासाठी 1760 मी. कांटेरी तार लागली. त्या बागेच्या कडेने समान अंतरावर चार विजेचे खांब असतील, तर प्रत्येक दोन लगतच्या खांबातील अंतर किती मीटर असेल ?
(1) 70 (2) $110\sqrt{2}$ (3) $70\sqrt{2}$ (4) 110

97. खालील पर्यायातील पूर्ण वर्ग असणाऱ्या संख्यांची जोडी कोणती ?
(1) 52.90 आणि 0.625 (2) 3.240 आणि 5.29
(3) 6.25 आणि 84.10 (4) 32.40 आणि 0.841

98. काही 100 रुपये आणि काही 50 रुपये किंमतीच्या नोटा असलेल्या पाकीटात पावणे सहासष्ट हजार रुपये आहेत. यावरुन त्या पाकिटात फक्त 50 रुपये किमतीच्या नोटांची संख्या किती असू शकेल ?
(1) 1012 (2) 1315 (3) 658 (4) 723

99. खालील क्रिया करुन येणाऱ्या उत्तराचा विसंगत पर्याय कोणता ?
(1) $\left[2\frac{1}{4} \times 2.6 + 1\frac{2}{5} \times 2.25\right]$ (2) $\left[2.25 \times 2\frac{3}{5} + \frac{9}{4} \times 1.4\right]$
(3) $\left[2.25 \times \frac{9}{4} + 2.6 \times 1\frac{2}{5}\right]$ (4) $\left[2\frac{1}{4} \times 2.6 + 1.6 \times \frac{9}{4}\right]$



Scanned by CamScanner

100. 9 आंब्यांची किंमत 396 रुपये आहे; तर $4\frac{3}{4}$ डझन आंब्यांची किंमत किती रुपये ?

(1) 1870 (2) 2090 (3) 2508 (4) 3036

101. खालीलपैकी योग्य रुपांतर असणाऱ्यां जोड्या कोणत्या ?

(अ) पावणे आठ $= \frac{31}{4}$ (ब) साडेबारा $= \frac{1250}{100}$

(क) सव्वा अठ्ठावीस = 28.025 (ड) $10\frac{3}{5} = \frac{103}{5}$


(1) फक्त 'अ' आणि 'ब' (2) फक्त 'क' आणि 'ड'

(3) फक्त 'अ' 'ब' आणि 'क' (4) फक्त 'ब', 'क' आणि 'ड'

102. $\frac{[3.6 \times 3.6] + [1.8 \times 1.8] + [3.6 \times 3.6]}{[2 \times 1.8] + [3.6 - 1.8]}$ = किती ?

(1) 1.8 (2) 3.6 (3) 5.4 (4) 1

103. शेजारील समद्विभुज चौकोन PQTU मध्ये रेख PU ∥ रेख QT $l$(UT) = 15 सेमी. $l$(QR) = 9 सेमी. आणि $l$(QT) = 38 सेमी. असेल, तर रेखांकित केलेल्या आणि रेखांकित न केलेल्या भागांच्या आकृत्यांच्या परिमितीतील फरक किती सेमी. ?




(1) 8 (2) 16 (3) 24 (4) 32

104. $\frac{2}{7}$ व $\frac{3}{5}$ या दोन संख्यांच्या दरम्यानची सर्वात मोठी संख्या खालील पर्यायांपैकी कोणती ?

(1) $\frac{3}{4}$ (2) $\frac{5}{9}$ (3) $\frac{4}{11}$ (4) $\frac{2}{3}$

105. समान तुकडे करण्यासाठी 105मी. मापाच्या दोरीचे दोन्ही टोके जुळविली. त्यानंतर त्या दुपदरी दोरीला तीन ठिकाणी कापले, तर प्रत्येक तुकड्याची लांबी किती असेल ?

(1) 17.5 मी. (2) 1312 सेमी. (3) 21 मी. (4) 1500 सेमी.

106. चार वर्षापूर्वी हमीदा व अक्षदा यांचे एकूण वय 41 वर्षे होते. जर हमीदा अक्षदापेक्षा 3 वर्षांनी लहान आहे; तर अक्षदाचे पाच वर्षानंतरचे वय किती वर्षे असेल ?

(1) 23 (2) 26 (3) 28 (4) 31

107. 2.2 मी. × 1.5 मी. मापाच्या पॉलिथिनच्या कागदापासून 15 सेमी. × 10 सेमी. मापाच्या दुधाच्या किती पिशव्या तयार करता येतील ?

(1) 110 (2) 220 (3) 1100 (4) 2200



Scanned by CamScanner

108. खालील पदांच्या श्रेणीत प्रश्नचिन्हाच्या जागी असणारे पद कोणते ?
2, 6, 20, ?, 110, 156
(1) 72 (2) 90 (3) 42 (4) 56

109. मूळ संख्यांचा गट दर्शविणारा पर्याय कोणता ?
(1) [139, 179, 149, 199] (2) [179, 119, 199, 149]
(3) [139, 119, 199, 179] (4) [119, 139, 149, 199]


110. 2012 साली प्रजासत्ताक दिन गुरुवारी साजरा झाला; तर त्याच वर्षातील लोकमान्य टिळक पुण्यतिथीचा वार कोणता ?
(1) मंगळवार (2) बुधवार (3) गुरुवार (4) शुक्रवार

111. जर $\frac{(x^2 - 2x - 24)}{(x+4)} = 0$ असेल; तर x = किती ?
(1) 6 (2) 8 (3) 12 (4) 3

112. क्रमवार दहा सम संख्यांची बेरीज 870 आहे; तर त्यातील फक्त सातव्या व आठव्या संख्येची बेरीज किती ?
(1) 482 (2) 386 (3) 282 (4) 182

113. खालील पर्यायांतील दोन्ही वेळांत घड्याळातील तासकाटा व मिनिटकाटा यांच्यात होणारे कोन एकरूप आहेत. त्यातील विसंगत पर्याय कोणता ?
(1) 2 : 20 आणि 10 : 40 (2) 3 : 25 आणि 8 : 35
(3) 6 : 10 आणि 5 : 50 (4) 7 : 05 आणि 4 : 55

114. सोबतच्या आकृतीतील चौकोनांची संख्या किती ?



(1) 10 (2) 12 (3) 13 (4) 14

115. 7 * 87 * 4 संख्येत '*'च्या जागी समान अंक असून त्याच्या स्थानिक किमतीतील फरक 59940 आहे, तर तो अंक कोणता ?
(1) 5 (2) 6 (3) 7 (4) 8


116. $\left[\frac{I}{C}\right.$ भागिले V गुणिले (L गुणिले M)$\left.\right]$ = किती ?
(1) L (2) V (3) C (4) D

117. खालीलपैकी योग्य विधाने कोणती ?
(अ) एकूरूप बाजू असणाऱ्या समांतरभुज चौकोनाला 'समभुज चौकोन' म्हणतात.
(ब) एकरूप कोन असणाऱ्या समांतरभुज चौकोनाला 'आयत' म्हणतात.
(क) एकरूप बाजू असणाऱ्या आयताला 'चौरस' म्हणतात.
(1) फक्त 'अ' आणि 'ब' (2) फक्त 'ब' आणि 'क'
(3) फक्त 'अ' आणि 'क' (4) तिन्ही 'अ', 'ब' आणि 'क'



Scanned by CamScanner

सूचना : स्तंभालेखाचे निरीक्षण करून प्रश्न सोडवा : [118 व 119]






Scanned by CamScanner

118. जर चारही गावांतील एकूण निरक्षर लोकसंख्या 6325 असेल; तर त्या गावांतील एकूण लोकसंख्या किती ?

(1) 25700 (2) 25100 (3) 25900 (4) 25300

119. 'ड' गावातील निरक्षर लोकसंख्या ही साक्षर लोकसंख्येच्या किती पट आहे ?

(1) 3 (2) $\frac{1}{3}$ (3) $\frac{2}{3}$ (4) $\frac{3}{2}$

120. 'पुनर्रचित अभ्यासक्रम 2012' नुसार इयत्ता चौथीच्या गणित विषयाच्या पाठ्यक्रम रचनेतील सात क्षेत्रात खालीलपैकी कोणत्या नव्या क्षेत्राचा / क्षेत्रांचा स्वतंत्रपणे समावेश केलेला आहे ?

(अ) अपूर्णांक

(ब) आकृतीबंध

(क) मापन

(1) फक्त 'अ' (2) फक्त 'ब'

(3) फक्त 'अ' आणि 'ब' (4) फक्त 'ब' आणि 'क'

## भाग - D : परिसर अभ्यास

121. माणूस सुरुवातीच्या (प्राचीन) काळात बोरूने लिहिण्यासाठी खालील पर्यायांपैकी कशाचा उपयोग करीत नसे ?

(1) कच्च्या वीटा (2) पपायरस झाडाचे साल

(3) भूर्जपत्रे (4) पत्रगुच्छ

122. इतिहासाच्या संदर्भाने 'पुरा' या शब्दाचा नेमका अर्थ कोणता ?

(1) वाडी किंवा वस्ती (2) दातेरी सुरी

(3) जुने (4) परगण्यातील मोठे गाव

123. मुघलकाळातील राज्यकर्ते आणि त्यांचा कार्यकाळ लक्षात घेता योग्य कालानुक्रम दर्शविणारा पर्याय कोणता ?

(1) हुमायून - अकबर - जहांगीर - शाहजहान

(2) अकबर - हुमायून - जहांगीर - शाहजहान

(3) हुमायून - अकबर - शाहजहान - जहांगीर

(4) अकबर - हुमायून - शाहजहान - जहांगीर

124. मध्ययुगीन कालखंडात लिहिला गेलेला ग्रंथ खालील पर्यायांपैकी कोणता ?

(1) नाट्यशास्त्र (2) रामचरितमानस (3) पंचतंत्र (4) अर्थशास्त्र

125. सातवाहन सत्तेची राजधानी असलेले 'प्रतिष्ठान' हे ठिकाण सध्या कोणत्या राज्यात आहे ?

(1) कर्नाटक (2) मध्यप्रदेश (3) आंध्रप्रदेश (4) महाराष्ट्र



Scanned by CamScanner

126. खालीलपैकी योग्य विधान/विधाने कोणते/कोणती ?

(अ) आदिलशाहने शहाजीराजांना 'सरलष्कर' हा किताब दिला होता.

(ब) आदिलशाहने शहाजीराजांना बंगळूरची जहागिरी बक्षीस दिली होती.

(1) फक्त 'अ' योग्य (2) फक्त 'ब' योग्य

(3) दोन्ही 'अ' आणि 'ब' योग्य (4) दोन्ही 'अ' आणि 'ब' अयोग्य

127. शिवरायांच्या हिंदवी स्वराज्याचे निष्ठावंत पाईक असलेल्या व्यक्तीचा पर्याय कोणता ?

(1) दौलतखान (2) फाजलखान (3) सलाबतखान (4) दाऊदखान

128. शिवरायांच्या अष्टप्रधानमंडळातील कोणाला युद्धप्रसंगी लढाई करावी लागत नसे ?

(1) अमात्य व न्यायाधीश (2) अमात्य व सचिव

(3) पंडितराव व न्यायाधीश (4) पंडितराव व संचिव

129. संस्कृत पंडितांना मराठी भाषेचे महत्त्व सांगताना 'संस्कृत वाणी देवें केली / तरी प्राकृत काय चोरापासून झाली ?'

(1) संत नामदेव (2) समर्थ रामदास (3) संत तुकाराम (4) संत एकनाथ

130. शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक प्रसंगी 'श्री राजा शिवछत्रपती' ही अक्षरे कोरलेले कोणते नाणे पाडण्यात आले ?

(1) तांब्याची शिवराई (2) सोन्याची मोहोर

(3) सोन्याची शिवराई (4) तांब्याची मोहोर

131. जिल्हा परिषद कामकाजा विषयी योग्य विधान दर्शविणारा पर्याय कोणता ?

(1) जिल्हा परिषदेची सदस्य संख्या कमाल 100 असते.

(2) जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसाठी उमेदवाराचे वय किमान 25 वर्षे असले पाहिजे.

(3) जिल्हा परिषद अध्यक्ष स्थायी समितीचा पदसिद्ध अध्यक्ष असतो.

(4) जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांचे सभापती जिल्हा परिषदेचे सभासद नसतात.

132. भारतीय राज्यघटनेतील सर्वात महत्त्वाचा मूलभूत अधिकार कोणता ?

(1) माहितीचा अधिकार (2) समानतेचा अधिकार

(3) धर्मस्वातंत्र्याचा अधिकार (4) घटनात्मक उपाययोजनेचा अधिकार

133. उच्च न्यायालय असणारे ठिकाण, खालील पर्यायांपैकी कोणते ?

(1) आगरतळा (2) दिसपूर (3) कोहिमा (4) ऐजॉल

134. संयुक्त राष्ट्रांशी (UNO) संलग्न असणाऱ्या कोणत्या संघटनेचे मुख्यालय पॅरिस येथे आहे ?

(1) आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा आयोग (IAEA)

(2) अन्न व शेती संघटना (FAO)

(3) शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटना (UNESCO)

(4) जागतिक आरोग्य संघटना (WHO)

135. वस्त्रांशी संबंधित गटात न बसणारा पर्याय कोणता ?

(1) मालपुरी (2) बिकानेरी (3) चोकला (4) पुंगल



Scanned by CamScanner

136. वर्षभराच्या काळात पृथ्वीवर वेगवेगळे ऋतू निर्माण होतात याचे योग्य कारण/कारणे खालील पर्यायांपैकी कोणते/कोणती ?

(अ) पृथ्वीचे परिभ्रमण

(ब) पृथ्वीची कक्षीय गती

(1) फक्त 'अ' (2) फक्त 'ब'

(3) दोन्हीही 'अ' आणि 'ब' (4) 'अ' आणि 'ब' दोन्हीही नाही

137. बैसाखी : पंजाब :: ओणम् : ?

(1) आसाम (2) केरळ (3) अरुणाचल प्रदेश (4) कर्नाटक

138. भारतातील पश्चिम घाटाच्या वैशिष्ट्यांपैकी विसंगत असणारी बाब खालील पर्यायांपैकी कोणती ?

(1) अन्नाईमुडी हे सर्वात उंच शिखर (2) युनेस्कोच्या वर्ल्ड हेरिटेज साईटस् मध्ये समावेश

(3) जैव वैविध्य संवेदन क्षेत्राचा एक भाग (4) बहुतांश अग्निजन्य खडकांनी बनलेला भूभाग

139. महाराष्ट्रातील ज़िल्हे व त्यात प्रामुख्याने आढळणारे खनिज यांची अयोग्य जोडी दर्शविणारा पर्याय कोणता ?

(1) सिंधुदुर्ग व भंडारा - लोहखनिज (2) भंडारा व नागपूर - मँगनीज

(3) सिंधुदुर्ग व चंद्रपूर - मँगनीज (4) नागपूर व चंद्रपूर - लोहखनिज

140. राष्ट्रीय महामार्ग जात नसलेल्या महाराष्ट्रातील जिल्ह्याचा गट दर्शविणारा पर्याय कोणता ?

(1) परभणी - लातूर - नांदेड (2) गडचिरोली - नांदेड - बीड

(3) बीड - लातूर - यवतमाळ (4) यवतमाळ - गडचिरोली - परभणी

141. नकाशाशी संबंधित 'समोच्चता दर्शक रेषांचे' वैशिष्ट्य खालील पर्यायांपैकी कोणते ?

(1) समोच्चता दर्शक रेषा या समुद्रसपाटीपासून समान उंचीवर असणारी ठिकाणे जोडणाऱ्या वास्तव रेषा आहेत.

(2) समोच्चता दर्शक रेषांमधील अंतर जास्त असल्यास जमिनीचा उतार मंद असतो.

(3) भूरचनेची लांबी व रुंदी दर्शविण्यासाठी प्रामुख्याने समोच्चता दर्शक रेषांचा वापर करतात.

(4) समोच्चता दर्शक रेषां दरम्यानचा रंग हा त्या ठिकाणच्या खोलीनुसार ठरतो.

142. 'खैर, कोरफड व निंब'या वनस्पती प्रामुख्याने खालील पर्यायांपैकी कोणत्या प्रकारच्या वनात आढळतात ?

(1) उष्ण प्रदेशीय शुष्क पानझडी वने (2) उष्ण प्रदेशीय काटेरी वने

(3) उष्ण प्रदेशीय निमसदाहरित वने (4) उष्ण प्रदेशीय आर्द्र पानझडी वने

143. मानवी शरीरात 'रासायनिक संदेशवाहक' म्हणून ओळखला जाणारा स्त्राव स्त्रवणाऱ्या ग्रंथी कोणत्या ?

(1) यकृत व जठर (2) अवटू व पाईनी

(3) यकृत व पाईनी (4) अवटू व जठर



Scanned by CamScanner

144. 'हेपॅटिटिस' या रोगासंबंधी असलेले योग्य विधान खालील पर्यायांपैकी कोणते ?
(1) जीवाणूंच्या समूहामुळे स्वादुपिंडाचा होणारा दाह.
(2) विषाणूंच्या समूहामुळे स्वादुपिंडाचा होणारा दाह.
(3) जीवाणूंच्या समूहामुळे यकृताचा होणारा दाह.
(4) विषाणूंच्या समूहामुळे यकृताचा होणारा दाह.

145. 'तंबाखू खाणे किंवा धुम्रपान करणे' यामुळे खालीलपैंकी कोणता परिणाम होतो ?
(अ) निकोटिन मेंदू आणि हृदयाला घातक ठरते.
(ब) फुफ्फुसात टार जमा झाल्यामुळे कर्करोग होतो.
(1) फक्त 'अ' (2) फक्त 'ब'
(3) दोन्ही 'अ' आणि 'ब' (4) 'अ' आणि 'ब' दोन्हीही नाही.

146. खालील पर्यायांपैकी अयोग्य विधान कोणते ?
(1) मानवी मादीमध्ये XX गुणसूत्र आढळते.
(2) प्रामुख्याने पक्ष्यांतील नरांमध्ये XX गुणसूत्रे आढळतात.
(3) प्रामुख्याने पक्ष्यांमध्ये नराकडून येणारे गुणसूत्र संततीचे लिंग ठरविते.
(4) फुल पाखरांसारख्या कीटकांच्या मादीत XY गुणसूत्रे आढळतात.

147. दुधासारखे द्रव पदार्थ अधिक काळ टिकवून ठेवतांना त्यातील जीवाणू मारून टाकण्यासाठी खालील पर्यायांपैकी कशाचा उपयोग होतो ?
(1) श्राव्यातीत ध्वनी (2) व्हिनेगर
(3) फिल्ट्रेशन पद्धत (4) कॅरमलायझेशन

148. खालील 'कारण' आणि 'परिणाम' यांचा अर्थ लक्षात घेऊन योग्य पर्याय निवडा.
**कारण :** (अ) समुद्राच्या पाण्याची घनता कमी असते.
**परिणाम :** (ब) समुद्रात पोहणे सोपे होते.
(1) फक्त 'अ' योग्य (2) फक्त 'ब' योग्य
(3) दोन्ही 'अ' आणि 'ब' योग्य (4) 'अ' आणि 'ब' दोन्ही अयोग्य

149. अन्नसाखळीतील द्वितीय भक्षक प्राणी खालील पर्यायांपैकी कोणता ?
(1) वटवाघूळ (2) गरूड (3) कोल्हा (4) चित्ता

150. 'शरणवने'या संकल्पनेचे वैशिष्ट्य खालील पर्यायांपैकी कोणते ?
(1) मध्यप्रदेशात आढळणाऱ्या देवराया
(2) महाराष्ट्रातील राखीव वनक्षेत्र
(3) शरण आलेल्या नक्षलवाद्यांना इनाम म्हणून दिलेला प्रदेश
(4) प्राचीन काळातील महाराष्ट्रातील अभयारण्य

---



Scanned by CamScanner